# मानवी तस्करी विधेयक आंतर चळवळ संवाद आणि राज्यस्तरीय चर्चासत्र

## १६-१८ एप्रिल २०१८, पुणे

*व्हॅम्प, संग्राम, सहेली संघ,मासूम आणि नशयांनी संयुक्तपणे महाराष्ट्रात काम करणाऱ्या सेक्स वर्कर संस्था संघटनासोबत व्यक्तींची तस्करी (प्रतिबंध, संरक्षण, आणि पुनर्वसन) विधेयक, २०१८ या विषयी पुण्यामध्ये दोन दिवसांचे राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित केले होते. पुणे, औरंगाबाद, जळगाव, परभणी, सांगली, मिरज,सातारा, कोल्हापूर, सोलापूर आणि नागपूर या ९ जिल्ह्यातून ४५ सी बी ओ आणि एन जी ओ प्रतिनिधी या चर्चेत सहभागी झाले होते.*

पहिल्या दिवसाची सुरुवात प्रत्येकाने आपलं नाव आणि आपल्या प्रिय व्यक्तीचं नाव सांगून झाली त्यानंतर सर्वांना मिळून निवडक व्यक्तींची नावं आणि आवडत्या व्यक्तीची नाव ओळखायला सांगितली या खेळामुळे खेळीमेळीने दिवसाची सुरुवात झाली.

मुंबई आणि हैद्राबाद इथे सेक्स वर्कर्स संबंधी नुकत्याच घडलेल्या दोन घटनांच्या बातम्यावर पहिली गटचर्चा झाली १.पोलिसांच्या भीतीने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारल्याने दोन सेक्स वर्कर महिला मुंबईत मरण पावल्या. २.प्रज्वला सुधारगृहात उझबेकिस्तानी तरुणीने केलेली आत्महत्या केली. या घटनांच्या वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या वाचून त्यावर महिलांना त्यांच्या प्रतिक्रिया विचारल्या गेल्या. या संदर्भात पोलीस, धाड, सुटका आणि सुधारगृह याबाबत सेक्स वर्कर्स महिलांचे अनुभव विचारले गेले आणि अशा घटनांविषयी पुढची रणनीती काय असावी यावर सर्वसहमतीने निर्णय घेण्याचे आवाहन संग्रामच्या मीना शेषु यांनी केले. “ ऑल इंडिया सेक्स वर्कर्स संघटनेने पोलीस आणि एमसॅक्सच्या पी डीना दोन महिलांच्या मृत्यूविषयी पत्र लिहील आहे पण त्याचा काही विशेष फायदा होईल असे वाटत नसल्याने आपण वेगळा काहीतरी मार्ग निवडावा”, असे त्यांनी सुचवले. या चर्चेतून काहीतरी निष्पन्न झालं पाहिजे.

सरकारच्या ताब्यात असताना व्यक्तीचा मृत्यू झाला तर ते मानवी अधिकाराचे मोठं उल्लंघन ठरते. सेक्स वर्कसाठी तस्करीची बळी म्हणून फॅशन डिझायनर उझबेकी तरुणीला हैद्राबादमधील प्रज्वला सुधारगृहात ठेवण्यात आले होते. ती भेट देण्याच्या व्हीसावर दिल्लीत राहत होती. नोव्हेंबर २०१७ तिला पकडलं होत. तिने गेल्या शुक्रवारी १३ एप्रिल रोजी तिने सुधारगृहात आत्महत्या केली. तिला तिच्या देशात परत जायचं होतं परंतु ती प्रक्रिया किती कठीण आणि वेळखाऊ आहे हे कळल्यावर निराश होऊन त्या तरुणीने सुधार गृहातच आत्महत्या केली.

मुंबईच्या घटनेत साडे नऊ वाजता पोलीस गेले. पहिल्या रिपोर्टमध्ये १० नंतर पोलीस गेले असं म्हंटल आहे. या वेळी रेड टाकता येत नाही. पोलीस् त्यांची एक कायद्यात बसवणारी स्टोरी तयार केली. महिला पोलीस तिथे का नाही? महिलांना पडल्यावर शरीरावर सगळीकडे जखमा झाल्या होत्या. तिथे ३० वर्षपासून धंदा चालू आहे मग तक्रार आत्ताच का? धंदा न करू देण्याची फौजच सुरु झाली आहे. – ऐन मोक्याची जमीन सर्वांना हवी आहे. पोलीस आपल्या संरक्षणासाठी आहेत आणि पोलीसांचीच सर्वात जास्त दहशत आहे.
पत्रकारांचे पूर्वग्रह असतात त्यातून प्रश्न विचारतात तशीच उत्तर मिळावयाच्या प्रयत्न करतात. धंद्याचा अड्डा शब्द का वापरला गेला? बायकांना गुन्हेगार केल्यामुळे बायका प्रश्न विचारत नाही , कोणत्याही वयात

सुधारगृहात टाकतात, पकडले के वैयक्तिक  स्वातंत्र्य हिरावून घेतात. महिलांना कायदा आणि अधिकारांची माहिती नाही. ज्या आवाज उठवतात त्यांना लक्ष्य केलं जातं.अशी चर्चा झाली.

या बातम्या वाचल्यावर उपस्थित सर्वांनी आपाआपले अनुभव सांगितले आणि प्रतिक्रिया दिल्या

- सेक्स वर्करना  पोलिस घेऊन जातील. पैसे मागतील पोलिसांची खूप  दहशत आहे.
- पोलीस  पैसे न घेता सेक्स करतात, दबाव आणतात.
- वारंवार त्यांना त्रास देत असतील
- व्यवसाय करतात हे कुटुंबाला कळेल या भीतीने महिला पोलिसांना घाबरतात
- संस्थावालेच रेड  घालायला लावतात
- लहान  मुली आहेत म्हणून पोलीस मारतात, कपडे काढतात.
- एका बाईची पेटीकोट, ब्लाऊजवर पैजण घालून धिंड काढली.
- पोलीस वाईट पद्धतीने बोलतात, शिव्या देतात
- माझा मोबाईल चोरायला आलेल्या लोकांना पकडायला पोलिसांची मदत मागितली तर मलाच आई, बहिणीवरून शिव्या घातल्या.
- पोलीस बायकांच्या राहत्याघरी जाऊन त्यांना बदनाम करतात त्यामुळे त्या बायकांना तिथे राहणं अवघड होतं.
- मारण्याची भीती असतेच त्यानंतर त्यांची वैद्यकीय तपासणी, शेल्टर होममध्ये रवानगी याची भीती वाटते.
- आम्ही कोणी चोरी न करताही चोरीचा आळ घेतला जातो.
- नागपूरला गंगा जामुनामध्ये धाड घातली तेव्हा एका बाईच्या त्या जागेत दांडू घातला होता, रक्त निघत होतं तिला दोन महिने इलाज करावे लागले.
- एकाच बाईला अनेकवेळा पकडलं जातं. एकजण पळताना चेंगरून मेली.
- अमळनेरमध्ये बायका  झोपडीत ५० वर्षे राहत होत्या . जबरदस्ती स्टे ऑर्डर आणली. गुंडांनी २० घर पाडली, जाळली. ज्या बोलल्या त्यांना खूप मारलं.
- पोलीस आणि गुंड यांच्यातला फरकच  लक्षात येत नाही. सगळीकडे हीच परिस्थिती आहे.
- नागपूर मध्ये स्थानिक गुंडांनी १०-१२ गल्ल्या वाटून घेतल्या आहेत.
- सेक्स वर्कर्स मध्ये एकी नसल्याने पोलीस रेड लाईट एरियात काम करणाऱ्या बायकांना त्रास देतात.
- पोलिस पगार कशासाठी घेतात? आमच्या पैशातून पगार घेतात तरी आपल्याला आवाज नाही. त्यासाठी आपल्याला काय कराव लागेल?
- मानव अधिकाराचे उल्लंघन केल जातं त्यावर काहीच आवाज नाही
- शोषण हा सेक्स वर्करच्या आयुष्यातला खूप गंभीर प्रश्न आहे. सेक्स वर्करच्या विरोधात काम करणाऱ्या आणि अधिकारासाठी काम करणाऱ्या संस्था वेगवेगळया दृष्टीकोनातून काम करतात

दुसऱ्या बातमीबद्दल मीना शेषु म्हणाल्या, “तिला नैराश्य आलं हे सांगून पोलीस आपली जबाबदारी झटकू पाहत आहेत. तिला सहा महिने काय कारणाने कुठे ठेवले होते ? आम्ही नुकतेच हैद्राबाद मध्ये असंच चर्चासत्र घेतलं तिथे ‘भूमिका’ नावाच्या वर्तमानपत्राच्या संपादक बाईनी आम्हाला सांगितलं की अमेरिकेच्या पेपरमध्ये बातमी आली की उज्वला सुधारगृह चालवणाऱ्या सुनिता कृष्णनच्या जीवाला धोका आहे . तिच्याकडे कोंडून ठेवलेल्या सहा बायकांनी खिडकीच्या काचा फोडल्या तर त्या काचेने त्यांना माझा खून करायचा होता असं सुनिता कृष्णन हिने पत्रकारांना सांगितलं म्हणजे तस्करीच्या बळी असलेल्या महिलांना तिने गुन्हेगार ठरवलं आणि  त्यांना जेलमध्ये घातलं. म्हणजे या महिला तिचा खून करण्यासाठी या धंद्यात आल्या. मग त्यांना पोलिसांनी पकडून

हिच्या सुधारगृहात ठेवलं आणि मग त्यांनी तिच्या खुनाचा प्रयत्न केला अशी कहाणी तिने सांगितली आहे. आणि तिला पोलीस, पत्रकार सर्वांची साथ आहे. ती पद्मश्री असल्याने तिचच सगळं ऐकतात. या बायका बिचाऱ्या यांच्याकडे पैसे नाहीत, त्या उच्च जातीच्या नसतील, उच्च वर्गाच्या तर नक्कीच नाहीत. म्हणून त्या अडकल्या आणि वाचवण्यासाठी तुम्ही त्यांना सोडवलं आणि त्यांनाच खुनाचा प्रयत्न करतात म्हणून जेलमध्ये टाकता?

एखादी सुधारगृहात असलेली बाई सुधारगृहाच्या संचालीकेपर्यंत कशी पोहोचेल? सहभागी महिलेने प्रश्न विचारला

हा सगळा प्रसिद्धी मिळवण्यासाठी केलेला खटाटोप आहे. मीना शेषु म्हणाल्या,  म्हणूनच आम्ही म्हणतो वाचवणाऱ्या पासून वाचवा. मीना शेषु म्हणाल्या. त्यामुळे धंदा करणाऱ्या बायकांच्या विरोधात जग कसं उभं आहे तुम्ही लक्षात घेतलं पाहिजे. आपल्याला एकत्र येऊन त्याच्या विरुद्ध आवाज उठवावा लागेल. पण आपले आवाज विभागले गेले आहेत. आपल्याला विचार करण्याची वेळ आली आहे. आतापर्यंत लोकशाही मार्गाने प्रश्न सोडवता येत होते. सांगलीला 'फ्रीडम फर्म'च्या माणसाला आम्ही हाकलवून देऊ शकलो पण नागपूरमध्ये ५००० बायका हे करू शकल्या नाहीत. जळगावमध्येही त्यांना रोखता आल नाही. आपण जर एकत्र येऊन याचा विरोध करू शकलो तरच काहीतरी होऊ शकेल नाहीतर धंदा बंद होईलच पण त्यानंतर बायकांचं काय होईल ते आपण थांबवू शकणार नाही.

सेक्स वर्कर्स महिलांच्या बाजूने कोणी नाही हे माहित असल्याने त्यांच्यावर जास्त अत्याचार होतात असं बायकांचं मत पडलं.

त्यावर मीना म्हणाल्या, "म्हणून आपल्याला सांगितलं पाहिजे धंदा करणं हे एक काम आहे, हे एक सभ्य काम आहे. हे काम करणे हा आमचा अधिकार आहे. ही स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. वाहतुकीच्या नावाखाली धंद्याला, धंदा करणाऱ्या बाईला बदनाम केलं जातेय. तिला गुन्हेगार ठरवलं जात आहे. बायका जीवानिशी जात आहेत. या सर्वांचा आपण विरोध केला पाहिजे".

हो आपण काहीतरी केलं पाहिजे असा सर्व सहभागींनी प्रतिसाद दिला आणि पुढे काय पावलं उचलणार याची यादी केली.

- ही माहिती महिलांपर्यंत पोहोचवता आली पाहिजे
- इटपा कायद्याची माहिती सर्वांपर्यंत पोहोचली पाहिजे.
- सर्वांनी एकत्र येऊन काही तत्काळ ॲक्शन घेतली पाहिजे.
- सुधारगृह ही अत्याचार गृह आहे तिथे खाणे, झोपणे याची चांगली सोय नसते.
- निदर्शन केली पाहिजेत
- कशी ॲडव्होकसी करता येईल ते ठरवलं पाहिजे
- मानवधिकार आयोगाकडे पोलीस, या वागणुकीविरुद्ध याचिका दाखल केली पाहिजे
- पोलीस आणि ट्राफिकिंग विरोधी संस्थांच्या कारवायांमुळे आपलं जे खच्चीकरण होत आहे याच्या नुकत्याच घडलेल्या घटना आणि आजपर्यंतचा अनुभव याच्या पुराव्यानिशी न्यायालयात गेलं पाहिजे

सीमा – अल्पवयीन असल्याने मला अमरावतीच्या सुधारगृहात ठेवलं होतं. आम्ही चार मुली होतो, आम्हाला एकाचा खोलीत ठेवलं होतं. आम्हाला इतर मुलींशी आणि त्यांना आमच्याशी बोलू दिलं जात नव्हतं. इतर मुलीना या वाईट मुली आहेत त्यांच्याशी बोलू नका त्या तुम्हालाही बिघडवतील असं सांगायचे. आमच्याबरोबर खूप भेदभाव व्हायचा.

जळगाव – माझ्या मावशीच्या मुलीला २१ दिवस सुधारगृहात ठेवलं होत तर तिथे इतके दिवस केलेल्या खाण्याची भरपाई करावी लागली. एक शेंगदाण्याची गोणी द्यावी लागली. सुटकेसाठी पैसे द्यावे लागतात.

दुर्गा – आम्हाला इतर बायकांशी बोलू दिलं नाही तर आम्ही कशा सुधारणार ?

मीना – सुधारण्यासाठी आपण खरोखरच वाईट बायका आहोत? सेक्स करतो म्हणून आपण वाईट ठरतो का ? सेक्स कोण करत नाही? धंदा करणाऱ्या बायकांना आपलं काम कधी खराब वाटतं का ? बायका कधीच खराब नसतात खचलेल्या असतात. इतर त्यांना त्यांचं काम वाईट आहे असं सांगतात म्हणून त्या आम्ही हे वाईट काम आहे हे काम आम्ही सोडू असं लिहून देतात. पण ज्या कामामुळे त्यांना जेवण, कपडे मिळतात, मेक अप करता येतो, मुलं शिकतात ते काम त्यांना वाईट वाटू शकतं का ? तुम्हाला ऐकायला आवडतं म्हणून आम्ही आमच्या कामाला वाईट म्हणतो असं बायकांनीच मला सांगितलं आहे. जग सांगते म्हणून आपल्याला वाईट म्हणू नये. तुला खरोखर काय वाटतंय ते बोल.

आरती – आपण मानवधिकार आयोग आणि मुंबई उच्च न्यायालयात जन हित याचिका दाखल करण्यासाठी कोणकोणत्या संस्था आपला पाठींबा देणार? या प्रश्नाला सर्व संस्थांनी एकमुखाने होकार दिला. ज्या एन जी ओ आणि सी बी ओ स्वेच्छेने तयार आहेत यासाठी जबाबदार व्यक्ती कोण तेही सांगावे. ही याचिका आपण सर्वांनी मिळून लोकशाही पद्धतीने तयार झाली पाहिजे. मागण्या, सूचना, शिफारशी तुमच्याकडून आल्या पाहिजेत आणि त्याबरोबर निर्णय घेऊ शकणाऱ्या व्यक्तीचे नाव सांगा.

कोर्टाला तुमचा अनुभव सांगायचा असेल तर तो पुराव्यासह सांगावं लागेल म्हणून पोलिसांच्या विरुद्ध, धाड टाकण्याविरुद्ध, तस्कारीविरोधी काम करणाऱ्या संस्था, सुधारगृह याविरुद्ध काही सांगायचं असेल तर सांगा आणि त्याला बरोबर पुरावा काय आहे ते सांगा. प्रत्यक्ष अनुभव, वर्तमानपत्रात आलेली बातमी, तुमच्याकडे क्रायसिस म्हणून केलेली नोंद असा काहीही पुरावा असू शकेल.

**अन्याय, अत्याचार आणि शोषण**

नेपाळी कोपिशाची कहाणी सर्वांना वाचायला देण्यात आली. कोपिशाला तिचा नवरा फसवून अलाहाबादमध्ये आणून एजंटला विकतो. तो तिला घरवालीला विकतो. ती तिला मारून, जबदस्तीने सेक्स वर्क करायला लावते. तिथून कंटाळून कोपिशा निघते आणि एजंटच्या मदतीने सांगलीला येते. तिथे तिला जबरदस्तीने आणलं हे कळल्यावर संग्रामच्या बायका जाऊन तिला परत नेपाळला सोडून आल्या.

या कहाणीत अन्याय काय, अत्याचार काय आणि शोषण काय याची वर्गवारी करण्यास सांगण्यात आलं.

शोषण

- नवऱ्याने कोपिशाला एजंटला विकलं.
- तिला विकलं, सेक्स करून पैसे दिले नाहीत.
- इतरांच्या कष्टाचा कोणी मलिदा खात असेलतर ते शोषण आहे.

अन्याय, शोषण म्हणजे काय?

- मर्जीविरुद्ध विकले हा अन्याय, फसवणूक
- छळ आणि शोषण यात फरक आहे का? हो आहे.
- असहाय्यतेचा फायदा घेणे म्हणजे शोषण आहे.
- कामाचा योग्य मोबदला मिळाला नाहीतर शोषण.

- मारणं हे शोषण आहे का ?  नाही हा अन्य्याय आहे.
- संमतीने काम करणे आणि नाईलाजाने काम करणं यात फरक आहे.

एखाद्याला मारून, धमकी देऊन काही करायला लावलं तर ते शोषण होईल. मारणे हा अन्याय आहे, धमकी देतो तेव्हा अत्याचार होतो. अन्याय आणि अत्याचार करणाऱ्याला यातून आर्थिक, वस्तू किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात काहीही फायदा मिळतो त्याला शोषण म्हणतात.

स्वत:हून धंदा करणं आणि जबरदस्तीने करायला लावणं यात दुसऱ्या कृतीत शोषण आहे. काम हे शोषण नाही ते काय पद्धतीने करायला लावल जातं त्याला शोषण म्हणतात. तुम्ही जे काम करता त्यातील अन्याय, अत्याचार कमी करण्याचा प्रयत्न केला नाही तर प्रत्येक कामात शोषण होऊ शकते. धंद्यात अन्याय , अत्याचार शोषण आहे ते कमी करण्यासाठी आपण एकत्र येणे आवश्यक आहे. ते कमी करून आपल्याला जास्त फायदा होईल यासाठी प्रयत्न करत राहावं लागेल. शोषण केलं म्हणून टाटा, बिर्लाचे कारखाने बंद होतात का? पण शोषण होतंय म्हणून धंदा बंद केला जातो.

**'रेड झाली हो'**

या समुदायाने पुढाकार घेऊन केलेल्या अभ्यासाच्या अहवाल व्हॅपच्या किरण देशमुख आणि मित्राचे शांतीलाल यांनी सादर केला. सेक्स वर्कर्सवर रेडचा काय परिणाम झाला. ज्या महिलांना पकडलं त्यांना काहीही मदत झाली नाही. पुणे, जळगाव, कोल्हापूर,सातारा, सांगली, कराड या जिल्ह्यातील घटनांचा समुदायाने हा अभ्यास केला.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ पासून अस्तित्वात आहे. संग्राम आणि राईट फोर चेंज या नेदरलँडच्या संस्थेने मिळून छापासत्रात सेक्स वर्कर्स महिलांवर होणारा अन्याय या बाबत समुदायाने पुरावे गोळा केले.

आमचा हा अभ्यास टप्प्या टप्प्याने पूर्ण केला . पहिला टप्पा होता अभ्यासाच्या तयारीचा. संशोधन कसं करायचं याचं प्रशिक्षण घेतलं, प्रश्नावली तयार केली , गल्ली,घरगुती आणि रस्त्यावर काम करणाऱ्या महिलांनी एकत्र येऊन गटचर्चा केली तेव्हा हा कायद्याचा महिलांना त्रास होतो याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे असं ठरलं. हे संशोधन २ वर्ष चाललं. सगळ्या बायका एकत्र आलो तेव्हा कळल आपले प्रत्येकाचे प्रश्न वेगळे आहेत म्हणून वेगवेगळं काम करायचं ठरलं. एका गटचर्चेत इटपाचा कायदा आपल्याविरुद्ध आहे हे जोराने पुढे आणलं. त्यानंतर त्याची सत्यता पडताळणी करण्यात आली (Research validation)  समुदायाने माहिती तपासली. कागदपत्राची तपासणी केली.

संगीता – गटचर्चेत फक्त रेडचा मागोवा घेतला , काही लोकांबरोबर रेडचा मागोवा आणि बायकांसोबत चर्चा झाली. आणि काही ठिकाणी म्हणजे कर्नाटक, झारखंड आणि केरळ इथे फक्त गटचर्चा झाली.

चार राज्ये , १४ जिल्हयात १५१ महिला गटचर्चेत सहभागी झाल्या. गल्लीत -५५, घरगुती- २४ आणि रस्त्यावर धंदा करणाऱ्या ७२ आणि धंदा करणाऱ्या बायकांची मुलं ५ या संशोधनात सहभागी झाले होते. गटचर्चेत सहभागी झालेल्या  १५१ बायकांपैकी  या सर्व वयोगटातील महिला सहभागी झाल्या होत्या. घरवाली, सेक्स वर्कर आणि जे दोन्ही आहेत यांच्याबरोबर चर्चा केली.

दुसऱ्या टप्प्यात आम्ही फक्त रेडवर आणि फक्त महाराष्ट्रात फोकस केला. पुणे, सांगली, सातारा,जळगाव, कोल्हापूर इथल्या ब्रोथेलवरच्या मोठ मोठ्या रेड्सचा अभ्यास केला. हा अभ्यास समुदायाच्या सहभाग आणि नेतृत्वाशिवाय होऊ शकत नाही.  ब्लाउजमध्ये रेकॉर्डर लपवून बायकांनी मुलाखती घेतल्या. समुदायाची आतली माहिती मिळाली. २४३ महिलांच्या मुलाखती घेतल्या.

त्यांना खालील प्रश्न विचारले

तुम्हाला धंद्यात जबरदस्तीने आणलं होतं का?

रेड पडली तेव्हा तेव्हा तुम्ही स्वेच्छेने धंदा करत होतात का?

रेड पडली तेव्हा तुमचं वय काय होतं?

सुधारगृहात किती दिवस होता? तिथे कसल्या तपासण्या झाल्या ? तिथे काही जबरदस्ती झाली का?

तिथे तुम्हाला काय प्रशिक्षण मिळाले का? त्यातून काय उत्पन्न मिळालं का ?

पुन्हा धंद्यात का आला ?

रेडच्या अगोदर तुमचं उत्पन्न/ कर्ज किती होतं? सुटून आल्यावर तुमचं उत्पन्न/कर्ज किती होतं?

आता तुम्ही काय करता? आता तुम्ही सेक्स वर्कर आहात, घरवाली आहात कि धंदा सोडला आहे?

मोठ मोठ्या रेड मध्ये पकडलेल्या २४३ बायकांपैकी फक्त दोघीजणी अल्पवयीन आहेत. आम्ही धंद्यात आलो तेव्हा तस्करी २७ बायकांनी मान्य केलं परंतु त्यांना आता धंद्यात राहायचं होतं. उरलेल्या ७९% महिला स्वेच्छेने धंद्यात होत्या. तरीही त्यांना वेगवेगळया कालावधीसाठी सुधारगृहात ठेवलं. २१ मुली अजूनही सुधारगृहात आहेत.

प्रश्न – त्यांना आपण बाहेर काढू शकत नाही?

मंदाकिनी – त्यांची नावं बदलली आहेत किंवा त्या बंगाली आहेत. सुधारगृहात बायकांची गुप्तता पाळतो म्हणून आम्ही बायकांची काही माहिती देणार नाही असं सांगून त्यांना भेटू दिलं नाही. पण माहितीचा अधिकार वापरून आम्ही त्यांची माहिती गोळा केली. बोयसर सुधारगृहात गेल्यावरही मुलींना भेटू दिलं नाही.

मीना - बायकांना वाचवलं की तुम्ही आमची मालमत्ता आहे असं वागवलं जातं. सेक्स वर्कर बायकांना अधिकार आहेत असं म्हणणाऱ्या संस्था या त्यांना सेक्स वर्क करायला लावतात अस वाचवणाऱ्या संस्थांना वाटतं. घरवालीप्रमाणेच त्या बायकांचं शोषण करतात. त्यांना इतर कुणाला भेटू दिलं जात नाही. कायदा पण असा आहे की न्यायाधीश सज्ञान बाईला सुधारण्यासाठी जास्तीत जास्त पाच वर्ष सुधारगृहात ठेवू शकतात. तिला मुलं, नवरा, पालक याच्या ताब्यात दिलं जातं. ४५ वयाच्या बायकांना त्यांच्या लहान भावाच्या ताब्यात देतात. त्यातही महिला एच आय व्ही पॉझिटिव्ह असेल तर कुटुंबाच्या हलगर्जीपणामुळेच असं झालं म्हणून त्यांच्याही हवाली केलं जात नाही.

आरती - आय टी पी ए हा तस्करीविरुद्ध कायदा आहे. तरीही या कांद्याच्या नावाखाली ४५ वर्षाच्या बाईने सांगितलं माझं वय ४५ आहे, मी स्वेच्छेने धंदा करते तरी तिला सुधारगृहात ठेवलं जातं. तिने सांगितलं हा माझा परिवार आहे ते मान्य केलं जात नाही. एच आय व्ही असेल तर परिवारामुळे तो झाला म्हणून सोडलं जात नाही. हा कायदा बनवला कशासाठी? आणि त्याचा उपयोग कशासाठी केला जातो ? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. सेक्स वर्कर्सचे किती अधिकार तस्करीच्या नावाने एक एक करून काढले जातात. सेक्स वर्कर महिलांसाठी मानवाधिकाराची चौकट आहे की नाही?

या चर्चेनंतर अभ्यासाचं विश्लेषण पुन्हा सुरु झालं सुधारगृहातून परत आलेल्या ४८% टक्के महिला पुन्हा धंद्यात आलेल्या आहेत. सात बायकांनी धंदा सोडला. छाप्यात पकडल्या, सुधारगृह, सुटका या चक्रातून गेलेल्या ७७ % बायका आज धंद्यात आहेत.

तस्करीचा उपाय यावर गटचर्चा केली तेव्हा कायदे  पूर्वग्रह दुषित आहेत. त्याची क्रूरपणे, अमानवी पद्धतीने राबवले जातात. त्यांना तेव्हढी सत्ता दिली आहे हे पुढे आलं. या बायका जर बळी आहेत तर तर त्यांची सुटका का करत नाही? या बायकांना गुन्हेगारांना असतात ते अधिकारही नाहीत. सुधारगृहात बायकांना काही मिळत नाही. जेलमध्ये निदान एक प्रक्रिया आहे. सुधारगृहातले भजन, जेवण आदी दैनदिन व्यवहार ही बायकांसाठी सांस्कृतिकदृष्ट्या कैद ठरते. हे सर्व कशासाठी? तर नवीन जीवन देण्यासाठी. शिवण, पापड आणि लोणची करायला शिकवतात. कोल्हापूरची एक बाई हे सगळं शिकून आली पण परत धंद्यात आली. कारण तिला सोडवण्यासाठी, पोलीस, सुधारगृह सगळयांना द्यायला घरच्या लोंकानी महिना १४ टक्के व्याजाने कर्ज काढलं होतं ते तिला परत करायचं होतं. वेठ बिगारांची सुटका केल्यावर त्याचं कर्ज सर्वात अगोदर माफ केले जाते.

तस्कारीवर आमचा उपाय काय आहे? सगळे एकत्र या. बायका संघटीत झाल्या, त्यांना निधी द्या. या बायका खूप कमी पैशात ही तस्करी बंद करू शकतील. या संशोधनातून आम्ही दोन गोष्टी शिकलो. छापा, सुटका, सुधारगृह एव्हढं करून या बायका वाईट पद्धतीने धंद्यात परत आल्या. नवीन जगण्याच्या कल्पनेने तस्करी रोखण्यात यश आलं नाही. परंतु जिथे जिथे बायका अगदी छोट्या प्रमाणातही संघटीत झाल्या आहे तिथे त्यांना तस्करी रोखण्यात यश आलं आहे.

काशीबाई – मी एकदा सुधारगृहात गेले तर तिथे जवळ खेळणाऱ्या  ८-१० वर्षांच्या मुलांना  पोलीस बायकांना शिव्या देतात ते आश्रम अस माहित होतं. प्रत्यक्ष सुधारगृहात गेल्यावर उभं राहवत नाही एव्हढी दुर्गंधी होती.

हेमलता – नागपूरच्या सुधारगृहात एक वर्ष वीजेचं बील न भरल्यामुळे बायका अंधारातच रहात होत्या आणि त्यांना पाणीही बाहेरून भरून आणावं लागत होतं. बायकांना तिथे स्वयंपाक घरात पाळी पाळीने काम करावं लागत होतं.

आपल्याला तस्करीविरुद्ध ठोस कारवाई करायची असेल तर असं संशोधन इतर जिल्ह्यात होऊ शकेल का? त्यासाठी आवश्यक पुरावे गोळा करता येतील का? नियम पाळून आपल्याला प्रश्न विचारता येईल का? असे प्रश्न मीना शेषु यांनी उपस्थित केले.

तेजस्वी – आपण अनेक वर्ष बायकांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल बोलतो पण त्याची नोंदणी आपण करत नाही. बायकांना माहिती असते, बायकांवर विश्वास ठेवला पाहिजे. या संशोधनामुळे खूप शिकायला मिळालं आणि पुढे जाण्याची दिशा मिळाली. पोलिसांनी नेलं तेव्हा काय कागदपत्रं विचारली, काय तपासण्या केल्या असे अनेक बारकावे कळले. पुरावे गोळा करण्याची सवय लागली. आपल्याला अजून बरीच माहिती मिळवायची आहे. या महिला सुधारगृहातून बाहेर आल्यावर त्यांच्यावर किती कर्ज असत आणि त्या किती टक्क्याने कर्ज घेतात.आपल्याकडे एक एक स्टोरी असेल पण संशोधनासाठी आपल्याला शेकडोची माहिती गोळा करावी लागेल. हे काम अवघड आहे. महिलांना पकडल्यावर तिला प्रत्येक टप्प्यावर पैसे द्यावे लागतात ती एक दीड लाख रुपये भरावे लागतात. सुटकेनंतर तिच्यावर अत्याचार वाढतात. त्यांच्या आजारावरही खूप पैसा खर्च करावा लागला. मानसिक आघाताने कुटुंबही कोलमडून पडतात.

‘मला असं वाटलं’ याला संशोधनात जागा नाही. ‘हे असं घडलं’ यालाच मान्यता आहे. हातात ठोस पुरावा असणं आवश्यक आहे. कुंटणखाने आणि धाड याचा महाराष्ट्रात प्रमाण खूप जास्त आहे. गोपनीयता आणि स्वातंत्र्य नाही. कायदा महिलांना वाचावतोय की आणखी शोषण करतोय? काही बायकांना आरोग्यासाठी खूप पैसा खर्च करावा लागतोय. हे पुढे  आलं पाहिजे. त्यासाठी ठराविक क्षेत्र, ठराविक काळात, बंधनात काम करावे लागेल.

**सेक्स वर्क आणि कायदा**

कायदेविषयक सत्र संग्रामच्या आरती पै यांनी घेतली. तस्करी रोखण्यासाठी आय टी पी ए हा कायदा आला. आपल्या धंद्याचे किती भाग आहेत? धंद्यासाठी सेक्स वर्कर, घरवाली, एजंट , ग्राहक, जागा, निरोध, प्रतिबंधक साधने लागतात. धंदा करण्यासाठी सेक्स वर्कर, कस्टमर आणि घरवाली किंवा एजंट या तीन गोष्टी आवश्यक आहेत. संपूर्ण जगात तीन प्रकारचे कायदे आहेत. पहिल्या प्रकारात तिघांनाही गुन्हेगार ठरवले आहे. विशेषत: मुस्लीम देशात असे कायदे आहेत. दुसऱ्या प्रकारात – अशत: गुन्हेगारीकरण आहे. सेक्स वर्क गुन्हा नाही. पण ज्या जागी काम करते तो, किंवा तिच्या कमाईवर जगणारा गुन्हेगार ठरतो. तिसऱ्या प्रकारात संपूर्ण सेक्स वर्क कायदेशीर आहे.

सेक्स वर्क कायदेशीर असावं कि नसावं यावर चर्चा केल्यावर काहीना वाटत होते धंदा कायदेशीर करावा कायदेशीर केल्यावर डिपार्टमेंट त्याच्याविरुद्ध आक्षेप घेता येणार,रेडपासून वाचतील असं काहीना वाटत होतं तर काहींनी गोपनीयता आणि स्वातंत्र्यावर गदा येईल, बंधन येतील म्हणून धंदा कायदेशीर असू नये असं मत दिलं.

सेक्स वर्क कायदेशीर झाल्यावर परवान्याशिवाय काम करता येणार नाही. वेगवेगळ्या कालावधीचा परवाना आणि त्याचे वेळोवेळी नुतनीकरण करावे लागते. बहुतांश देशात हा परवाना स्थानिक पोलीस देतात. हा परवाना मिळण्यासाठी आरोग्य तपासणी करावी लागेल आणि सरकारी डॉक्टर तसे प्रमाणपत्र देईल. गुप्तरोग, एच आय व्ही असणाऱ्या व्यक्तीला परवाना मिळू शकणार नाही. कामासाठी झोन ठरवले जातील. या चर्चेनंतर कोणीही सेक्स वर्कला कायदेशीर करण्याला पाठींबा दिला नाही.

गुन्हेगारी मुक्त वेश्याव्यवसाय – आम्हाला गुन्हेगार ठरवणाऱ्या कायद्यातून मुक्त करा. आज न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाच्या काही भागात गुन्हेगारीमुक्त वेश्या व्यवसाय केला जातो. सज्ञान आणि स्वेच्छेने सेक्स वर्क करणाऱ्या महिलांवर कायदे लावू नयेत. सेक्स वर्कर, त्यांची कमाई, कामाईवर जगणारे, हातवारे करणे याला गुन्हा ठरवल्यास तर पूर्ण धंदा गुन्हा ठरतो.

**आय टी पी ए – अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंध कायदा**

आय टी पी ए मध्ये कुंटणखाण्याच्या व्याख्येतच समस्या आहे. दोनहून जास्त सेक्स वर्कर स्वत:च्या किंवा इतर कुणाच्या फायद्यासाठी धंदा करतात त्याला कुंटणखाना म्हंटल जातं. आमच्या कामच्या जागेलाच तुम्ही शोषणाच ठिकाण ठरवलं त्यामुळे कुंटणखानाच बेकायदेशीर ठरतो. त्यामुळे ही जागा भाड्याने देणे –घेणे हा गुन्हा आहे. एका बाईच्याही कमाईवर जगणारा कोणीही मुलं, नवरा, पालक गुन्हेगार ठरतात.

महिलांवर कारवाई कारणासाठी नकली ग्राहक पाठवतात. बनावट, नकली ग्राहक यामुळे तस्करी कमी करण्यास काही मदत होत नाही हे न्यायालयाने मान्य केले आहे. कोणालाही या धंद्यात आणणाऱ्या व्यक्तीला गुन्हेगार समजल जातं. संमती नसताना गुन्हा आहे पण संमती असेल तर तिला मदत करणारी त्रयस्थ व्यक्ती पण गुन्हेगार ठरवतात. धंदा करणं गुन्हा नाही असं म्हणतात आणि धंद्याला मदत करणाऱ्या लोकांना गुन्हेगार ठरवलं जातंय.

प्रश्न - या सुटका करणाऱ्या संस्थांचं इव्हॅल्यूएशन होत नाही का ?

आरती - तस्करी रोखण्यासाठी आज करोडो रुपये खर्च होत आहेत. लैंगिक अत्याचार, शोषण आणि गुलामीसाठी महिलांची तस्करी हा खूप मोठा मुद्दा आहे. आपल्या टार्गेटेड इंटरव्हेन्शन प्रमाणे आकड्यावर आधारित त्यांना पैसे मिळतात. तुम्ही किती बायकांची सुटका केली आणि पुनर्वसन केलं आहे त्या संख्येवर मानवी वाहतुकीसाठी काम

करणाऱ्या संस्थाना काम करण्यासाठी निधी मिळतो. सेक्स वर्कर्सचे अधिकार, त्यांच्यावर संशोधन करण्यासाठी पैसे मिळत नाही. कोणी स्वेच्छेने सेक्स वर्क करत नाही हे म्हणणं त्यामुळे जोरदारपणे पुढे येतेय.

आपल्याकडे पुरावे गोळा करण्याची क्षमता आहे. आय टी पी ए च्या दुरुपयोगाचा डेटा गोळा केला तरी आय टी पी ए हलवू शकतो. डोनरला दिलेल्या पैशाचा हिशेब देण्यासाठी दबाव आणला त्यामुळे ते थोडे हलले आहेत. पण सरकार हलत नाही. राजकीय दृष्टीकोनातून सोयीचे असल्याने मानवी तस्करीच्या कामाला पाठींबा मिळतो. आणि धंदा करणाऱ्या बायकांना सहभागी करून घेतल जात नाही.

हेमलता - शासनाचा एक विभाग आरोग्य- धंदेवाल्या बायकांबरोबर काम करायला सांगतो, पोलीस आणि वकिलांबरोबर अॅडव्होकसी करा म्हणतात आणि गृह आणि महिला विकास खाते त्यांच्याविरुद्ध काम करतात.

आरती - आय टी पी ए हा वेश्यांच्या विरोधात नाही असं सांगितलं जातं. असं असेल तर संमतीने सेक्सवर्क करणाऱ्या सज्ञान व्यक्तीला वगळले जावे.

आय टी पी एच्या कलम ६ -१ – इच्छेने किंवा इच्छेविरुद्ध कुंटणखाण्यात असणे बेकायदेशीर मानले आहे. कोणत्याही 'सार्वजनिक ठिकाणच्या '२०० मीटरच्या आत धंदा करायला मनाई आहे. इशारे करून बोलावणे गुन्हा आहे. हे गुन्हे घडत असतील तर रेड होतात आणि बायकांना सुधारगृहात नेतात.

सर्व महिला तस्करी केल्या आहेत असं समजून सुधारगृहात नेलं जातं. बायकांना कोणाशी बोलू दिल जात नाही.किमान २१ दिवस कैदेत ठेवल जात त्यानंतर न्यायालयाच्या मर्जीनुसार २-५ वर्षे कैदेत ठेवतात. वकील करता येत नाही. कुटुंब कोण ते न्यायालय ठरवतं. बायकांना बळी समजलं जातं त्याच कायद्यात तिला हद्दपार करण्याची तरतूद केलेली आहे.

**३७० कलम.**

तस्करी म्हणजे काय ?

महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध वेश्याव्यवसायात आणणे. कोणत्याही कामात महिला, पुरुष, मुलं यांना बेकायदेशीररित्या आणणे, ढकलणे याला तस्करी म्हणतात. तस्करीची कृती, काय पद्धतीने/कोणत्या माध्यमातून आणि कोणत्या हेतूने झाले या तिन्हीचा मेळ असेल तरच ती तस्करी समजली जाते. हेतू हा नेहमी शोषण असला पाहिजे. इच्छेविरुद्ध आणणे,लपवून ठेवणे, ताब्यात ठेवणे,एका ठिकाणाहून दुसरीकडे घेऊन जाणे, स्वीकारणे याला तस्करी समजल जातं. काय प्रकारे? फूस लावून, भीती दाखवून, बळजबरीने, काही लालूच दाखवून व्यक्तीला एकीकडून दुसरीकडे नेणे. तिन्ही गोष्टी त्या व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध आणि एकत्र झाल्या तरच न्यायालयात तस्करी सिद्ध होते. कुणाला जबरदस्ती आणलं तर ते अपहरण होईल, नको असलेल्या मुलाला, पालकांना दुसरीकडे सोडलं तर ती तस्करी होत नाही. कारण तस्करीसाठी शोषण होणं आवश्यक आहे. अल्पवयीन मुलांच्याबाबतीत कशा प्रकारे आणलं/ माध्यम महत्वाचे नाही कारण मुलांना संमती देता येतच नाही.

मानवी तस्करी होते, आणि हे खूप मोठ्या प्रमाणात होत आहे हा खूप गंभीर गुन्हा आहे त्यामुळे त्याला सोपे न करता कडक शिक्षा झाली पाहिजे. मुल दत्तक देण्यासाठी पळवून आणले तरी ती तस्करी आहे. बायकांना जबरदस्तीने आणले किंवा संमतीने आणलं तरी सेक्स वर्कमध्ये शारीरिक आणि लैंगिक शोषण अभिप्रेत असल्याने ती तस्करीच समजली जाते. मुली लहान असतील तर त्यांना कायद्याचं पूर्ण संरक्षण मिळालंच पाहिजे. तस्करी झालेली अल्पवयीन मुलगी अथवा तस्करी झालेली महिला यांच्याशी लैंगिक संबध ठेवणाऱ्या व्यक्तीला या गुन्ह्याबद्दल ३७० अ नुसार अटक केले जाते.त्याला कडक शिक्षा आहे जामीन मिळत नाही.

३७० कलम हे २०१४ साली आलं २७० ए मध्ये जो कोणी तस्करी केलेल्या अल्पवयीन बालकाशी लैंगिक संबंध ठेवणारा/ हे शोषण करणारा हा गुन्हेगार आहे. याचा दुसरा भाग असा कि तस्करी केलेल्या महिलेबरोबर लैंगिक संबंध ठेवणारी व्यक्ती गुन्हेगार आहे. गेली दोन वर्षे या कायद्याचा आय टी पी ए प्रमाणे उपयोग होऊ लागला आहे. हैद्राबाद आणि मुंबई उच्च न्यायालयाने गिऱ्हाईकांना अटक करायला सांगितलय. त्यामुळे आता पोलीस गिर्हाईकांना उचलत आहेत. तस्करीचा त्याच्याशी काही संबंध नाही. गिऱ्हाईकाला उचलून नेतात ते केस लढू इच्छित नाहीत त्यामुळे पैसे देऊन स्वत:ची सुटका करून घेतात.

या कायद्याला आपल्या आव्हान द्यायचं असेल तर ज्या गिऱ्हाईकला अटक केलं तर त्या गिऱ्हाईकाला ज्या सगळ्या प्रक्रियेतून जावं लागलं त्या सर्वांची सविस्तर नोंद करावी लागेल. ते दाखवून या कलमाचा कसा गैरवापर होतो हे दाखवून देता येईल. औरंगाबादमध्ये अटक केलेल्या ग्राहकांची नावं पत्ता आणि प्राथमिक अहवालात त्यांच्यावर दाखल केलेली कलम या तपशीलासह वर्तमानपत्रात बातम्या छापून येतात तो एक मोठा पुरावा होऊ शकतो.

**मानवी तस्करी विधेयक २०१८**

मनेका गांधीने २०१६ मानवी तस्करी विधेयकाचा पहिला मसुदा जाहीर केला त्यावर आम्ही आमची प्रतिक्रिया दिली. त्यानंतर ४-५ ड्राफ्ट झाले. मनेका गांधी यांनी आम्हाला भेटायला नकार दिला परंतु काही सामजिक संस्थांच्या प्रतिनिधींबरोबर आम्ही महिला बाल विकास सचिव यांना भेटलो. त्यांनी आम्हाला ९ वा मसुदा वाचायला दिला . संरक्षित गोपनीय सरकारी कागदपत्र आहे म्हणून फक्त वाचायला दिला. गृह खात्याने विधी खात्याला या बिलावर चर्चा करण्यासाठी मिटिंग करायला सांगितलं. प्रत्यक्ष विधेयक न दाखवता आमच्याकडून माहिती काढत होते. जो मसुदा होता त्यावर आम्ही आमची प्रतिक्रिया नोंदवली. महिला बाल विकास नेही ४-५ चर्चा केल्या पण सेक्स वर्कर्सच्या अधिकारासाठी काम करणाऱ्या संस्थाना सहभागी करून घेतलं नाही. महिला विकास खात्याने सांगितलं हे विधेयक तस्करीविरुद्ध आहे तुमच्यासाठी नाही. सक्तीची मजुरी, सरोगसी, सेक्स वर्कर, अभिव्यक्ती स्वातंत्र्य या चार क्षेत्राशी संबंधित आहे.

काय आहे या विधेयकात

- यात १५ भाग, ५९ कलमं आहेत.
- वेगवेगळ्या जिल्हा, राज्य आणि केंद्र तपासणी यंत्रणा आणि दिलासा आणि पुनर्वसन यंत्रणा
- शोध, सुटका याची प्रक्रिया
- जिल्हा आणि राज्य पातळीवर तस्करीला प्रतिबंध
- तस्करीला बळी पडलेल्याचे संरक्षण आणि पुनर्वसन
- प्रत्यार्पण
- नुकसान भरपाई, दिलासा
- विशेष न्यायालयाची स्थापना आदी या विधेयकाचे भाग आहेत.

हे खूप महत्वाकांक्षी विधेयक आहे. याच्या अंमलबजावणीसाठी १० नवीन यंत्रणा स्थापन केल्या जातील. पाळत ठेवणे, छापा, सुटका याचं काम करेल. केंद्र, राज्य, जिल्हा पातळीवर तस्करी नियंत्रण यंत्रणा स्थापन केल्या जातील. विशेष न्यायालय स्थापन केले जातील.

वेठ बिगारी, नैसर्गिक किंवा तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्भधारणा, लग्नासाठी, भीक मागण्यासाठी तस्करी या कृती या गुन्हा ठरतील. अंमली पदार्थ देऊन बेशुद्ध करणे, शारीरिक बदलासाठी हार्मोन्स देणे, याचा परिणाम होऊन

त्या व्यक्तीला काही इजा वा मृत्यू झाला, महिला गर्भवती असेल किंवा तस्करी दरम्यान गर्भवती झाली, या पद्धतीसाठी शिक्षा होईल.

मानसिक दृष्ट्या अपंगांची तस्करी, बेकायदेशीर स्थलांतर या सर्वांना गंभीर गुन्हा समजले आहे.

ज्या ठिकाणी शोषण होते अथवा होण्याची शक्यता आहे. ( प्रथमच शक्यतेबद्दल कायदा बनवला जात आहे), तस्करीला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती, पोस्टर्स आदी मुद्रित साहित्य निर्मित करणारा गुन्हा समजले आहे.

बनावट कागदपत्र बनवणे, अधिकारप्राप्त व्यक्तीने कर्तव्यात कसूर करणे, व्यक्तीच्या खरेदी, विक्रीत सहभाग,अश्लील फोटो/ व्हीडीयो पर्यटकांना दाखवणे,पटवणे, कोणत्याही तस्करी केलेल्या व्यक्तीला वश करणे, विकणे, लैंगिक शोषणाची चित्रं दाखवणे हा गुन्हा आहे. या विधेयकात असलेल्या बहुतांश तरतुदी या अगोदरच ३७०. जे जे कायदा, ३७४ – सक्तीचा रोजगार, आय टी पी ए, बाल कामगार ,वेठ बिगारी आदी कायद्यात अगोदरच समावेश आहे.

प्रस्तावित मसुद्यातील तरतुदीबद्दल मुख्य आक्षेप -

इटपा, ३७० आणि आता हा कायदा असे तीन स्तर झाले आहेत. आत्ताचा कायदा सेक्स वर्कर्ससाठी नाही असं सांगितलं जातं. तसं असेल तर त्याचा स्पष्ट उल्लेख करा असं आमचं म्हणणं आहे. हा कायदा सेक्स वर्कर्सला लागू नाही असे लिखित जाहीर करा. नाहीतर इटपा आणि नवीन कायदा यामध्ये सेक्स वर्कर बायका भरडून निघतील.

या कायद्यात लैंगिक शोषणाच्या गुन्ह्याची योग्य व्याख्या करण्यात आली आहे त्यामुळे हा कायदा लागू केल्यास इटपा रद्द करायला हवा. सगळेच कायदे आणि तरतुदींची खिचडी करू नये अशी आमची मागणी आहे.

ज्या १० नवीन यंत्रणा उभ्या केल्या जाणार आहेत त्यापैकी काही अगोदर अस्तित्वात आहेत आणि कार्यरत आहेत त्यांचा समन्वय करण्याची गरज असताना आणि अनेक खटले प्रलंबित असताना नवीन न्यायालयं स्थापन करण्याचा घाट घातला जात आहे.

इटपाच्या कलम १८ प्रमाणेच छापा, सुटका, पुनर्वसनाची प्रक्रिया आहे. बळी पडलेल्या सज्ञान व्यक्तीनेही त्याला सुटका नको असे सांगितले तरी न्यायाधीश त्याचे म्हणणे नाकारू शकतात. अशी तरतूद इतर कोणत्याही गुन्ह्यात दिली जात नाही.

नाल्सा, डालसा धंदा करणाऱ्या बायकांबरोबर काम करतोय असं दाखवतात. पण बायकांचं मूळ दुखणं यावर ते काम करायला ते तयार नाहीत.

जिल्हा तस्करी विरोधी समितीला अवाजवी ताकद दिली आहे. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी या तस्करी समितीचे म्हणणं ऐकणे न्यायाधीशांना बंधनकारक आहे. या कायद्यात प्रथमच अशी तरतूद करण्यात आली आहे.

तस्करीला बळी पडलेल्या व्यक्तीला समुपदेशन करून मूळ घरी, राज्यात परत पाठवले जाईल.

शोषण आणि उच्चाटन – शोषणासाठी वापरली गेलेली आणि वापरण्याची शक्यता असलेल्या ठिकाणाहून लोकांची सुटका केली जाईल. वेठबिगारी कायद्यात वेठबिगार कामगारांच्या कुटुंबियांना त्याच्या राहत्या ठिकाणाहून हलवलं जात नाही.

ही शोषणाची सर्व ठिकाणं बंद करणार का ? कारखाने, दवाखाने, रुग्णालये, तुमच्या आमच्या घरांना हे टाळा ठोकणार का? की फक्त सेक्स वर्करला लक्ष्य करणार? मानवी तस्करीला चिथावणी मिळेल असं काहीही कृत्य हे कलम अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी धोकादायक आहे. अश्लील साहित्यावर हा कायदा गदा आणू शकतो.

या सत्राने दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचा समारोप झाला.

---

कार्यशाळेस सहभागी :

१.नंदिनी, हरदासी स्वाधार , जळगाव

२. सयीदा शेख , हरदासी स्वाधार , जळगाव

३.भारती पाटील , आधार संस्था , जळगाव

४ सीमा शर्मा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी ,नागपूर

५. शोभा पवार ,इंडियन रेड क्रॉस सोसायटी ,नागपूर

६. हेमलता लोहावे, इंडियन रेड क्रॉस सोसायटी ,नागपूर

७ .पूजा पुजारी क्रांती महिला संघ , सोलापूर

८. सुमन पवार,क्रांती महिला संघ, सोलापूर

९. काशीबाई जाधव,क्रांती महिला संघ,सोलापूर

१० रेणुका जाधव क्रांती महिला संघ,सोलापूर

११ संदीप पाच्पोडे,गोदावरी फौन्डेशन,औरंगाबाद

१२. मीना पांडे,गोदावरी फौन्डेशन,औरंगाबाद

१३ मनीषा म्हात्रे,गोदावरी फौन्डेशन , औरंगाबाद

१४.अर्जुन जगताप,मराठवाडा ग्रामीण विकास संस्था,औरंगाबाद

१५ अनिता बनकर, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था,औरंगाबाद

१६ बाबिता काळे, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था,औरंगाबाद

१७.आरती झोडपे, महिला जागृत सेवाभावी संस्था, परभणी

१८.रेणुका झोडपे, महिला जागृत सेवाभावी संस्था, परभणी

१९ खालिद शेख, महिला जागृत सेवाभावी संस्था,परभणी

२० रवींद्र त्रिभुवन, प्रेरणा सामाजिक संस्था , वैजापूर , औरंगाबाद

२१ कडू बाई गोडेराव, प्रेरणा सामाजिक संस्था , वैजापूर ,औरंगाबाद

२२ संगीता मनोजी,संग्राम/वंप,सांगली

२३ किरण देशमुख, संग्राम/वंप,सांगली

२४. माया गुरव, संग्राम/वंप,सांगली

२५ रेणुका काळे, संग्राम/वंप,सांगली

२६ जया जाधव, संग्राम/वंप,सांगली

२७ राजेंद्र नाईक, संग्राम/वंप/मित्रा,सांगली

२८. सुनील तेरडाळे,संग्राम/वंप/मित्रा,सांगली

२९ अक्षय सकट, संग्राम/वंप,सांगली

३० सुलभ होवाळे, संग्राम/वंप,सांगली

३१ यशोदा न्यायनीत, संग्राम/वंप,सांगली

३२. माला कुंभार,सहेली, पुणे

३३. लक्ष्मी कदम,सहेली,पुणे
३४. प्रिया कश्यप, सहेली,पुणे
३५. दुर्गा भुई, सहेली,पुणे
३६. जमिला दलइत,सहेली,पुणे
३७ मंदाकिनी डसले,सहेली,पुणे
३८. तेजस्वी सेवेकरी,सहेली,पुणे
३९. संयोगिता ढमढेरे
४०. काजल,मासूम संस्था,पुणे
४१. शांतीलाल काळे,संग्राम
४२. आरती पै,संग्राम
४३. मीना सेशु,संग्राम
४४. मीना शेंडकर,मासूम
४५.वैशाली कुंभारकर,मासूम
४६.मनीषा कुन्जीरे,मासूम
४७ रोहिणी कुन्जीरे,मासूम
४८ सुनंदा खेडेकर,मासूम
४९.कविता जगताप,मासूम
५० योगेश धेंडे,मासूम
५१ हेमलता पिसाळ,मासूम
५२. सुचेता देशपांडे, एफ.एच.आई
५३. मुक्त शिंगटे,स्त्री मुक्ती संघटना
५४ विजया जोरी,प्रयास
५५. शिरीष दरक,प्रयास.
५६ शैलजा अरलकर
५७. रमेश अवस्थी,मासूम
५८. सुहास कोल्हेकर. एन ए .पी .एच
५९. निलांगी सरदेशपांडे
६० भावना जाधव,एफ आर सी एच
६१ पूनम जे. स्त्री मुक्ती संघटना
६२. किंबेर्ली एल. बापू तट्रस्ट
६३. तृप्ती मैती, साथी
६४. करबान आर. सल्लागार,.पी एम नायर,टी.आय.एस,.एस
६५. शितल, मासूम
६६. सोनाली सुतार,मासूम
६७. मंगल मगर, मासूम

६८. अलका पी. स्त्री मुक्ती संघटना
६९ अभिषेक गिरजे
७०. रत्न यशवंते,अम्नेस्टी  इंटर नशनल इंडिया
७१ वंदना कुलकर्णी , आलोचना
७२. संगीता गांधी,
७३. अनुप्रिया,सेहत
७४.आर्मर मोदी
७५.उज्वला एम. क. इन एस.एस
७६ वैभव पवार,मेहेर संस्था
७७सुरज नायर,मेहेर संस्था
७८.उत्पल व्ही बी. सहेली
७९.विद्‌या देशमुख,तथापि
८०.रोहिणी साहनी
८१ व्ही. कल्याण शंकर, सिम्बोसीस स्कूल ऑफ एकोनोमिक्स
८२.शेली सहा
८३.लक्ष्मी कदम,सहेली संघ
८४.प्रिया कश्यप, सहेली संघ
८५.मीना कोळी, सहेली संघ
८६.माला कोळी,सहेली संघ
८७.गीताली व्ही.एम ,नारी समता मंच
८८.प्रशांत कुंटे,नारी समता मंच
८९.रोनी थोमस,नारी समता मंच
९०.सचिन पाटील
९१.सुनिता शील,विधायक ट्रस्ट & एफ एम इ एस
९२.रीतम्भरा,मासूम
९३.शनाया शेख,दिनमान न्यूज
९४.सुनिता भावे,महाराष्ट्र टाईम्स
९५.संदीप शिंदे,दिनमान न्यूज
९६.नम्रता फडणीस,लोकमत
९७.संजय कांबळे,ए.पी पुणे युनिव्हर्सिटी
९८.मुनीर सुलतान,अग्रणी एन.जी.ओ
९९.निखील नदीश्वर
१००. प्रशांत निकम,फ्री लान्स जर्नालीस्त
१०१. सुदेश मिटकर,सामना